जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद
अदालत रोड, औरंगाबाद ४३१ ००१
निविदा सूचना

जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद, येथील ग्रंथालय विभागामधील जुनी अप्रचलीत पुस्तकांची विक्री करणेसाठी स्थानिक बाजारपेठेतून मोहरबंद निविदा / दरपत्रके दिनांक २८/०८/२०२५ ते ०८/०९/२०२५ या कालावधीत मागविण्यात येत आहेत. निविदाकारांना सदरील पुस्तके हे कार्यालयात येवुन घेऊन जावे लागेल.

मोहरबंद निविदा / दरपत्रके दिनांक ०८/०९/२०२५ रोजी कार्यालयीन वेळेपर्यंत किंवा त्यापुर्वी जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद या कार्यालयात पोहोचणे आवश्यक आहे. त्यानंतर प्राप्त झालेल्या मोहरबंद निविदा / दरपत्रकांचा या प्रक्रियेत समावेश करण्यात येणार नाही. विहित मुदतीत प्राप्त मोहरबंद निविदा / दरपत्रके शक्य झाल्यास दिनांक ०९/०९/२०२५ रोजी दुपारी ०२:१५ वाजता उघडण्यात येतील व पडताळणी अंती त्याबाबत व्यवस्थापन समिती कार्यवाही करेल.

हे कार्यालय कोणतेही कारण न सांगता प्राप्त मोहरंबद निविदा / दरपत्रके स्वीकारण्याचे किंवा नाकारण्याचे सर्व अधिकार राखुन ठेवत आहे.

आदेशावरून

28.08.2025

प्रबंधक
जिल्हा व सत्र न्यायालय, औरंगाबाद
दिनांक : २८/०८/२०२५

टिप:

१. निविदाकारांनी निविदा / दरपत्रक सादर करतांना त्यावर जीएसटी/एसजीएसटी क्रमांक नमूद असलेले तथापि, जीएसटी / क्रमांक लागु नसल्यास तत्सम प्राधिकरणाकडील नोंदणी क्रमांक नमूद असलेले निविदाकारांच्या लेटर हेडवरील दरपत्रक वैध असतील.
२. निविदाकारांनी निविदा / दरपत्रकासोबत पॅनकार्डची छायांकीत प्रत जोडणे बंधनकारक असेल.
३. प्रत्येक निविदाकारास फक्त एक निविदा / दरपत्रक सादर करण्याची परवानगी असेल.
४. खरेदी प्राधिकाऱ्या बरोबर हितसंबंधाचा संघर्ष नसल्याबाबत आणि इच्छूक संस्थेने एकल निविदा देण्याबाबत निविदाकारांना हमीपत्र सादर करावे लागेल.

आस्थापन विभाग: एक प्रत मुख्य नोटीस बोर्ड वर बेलीफ मार्फत लावणे.